गांवकरी
www.gavakari.net
28 Jul 2026 - Page 6

सायबर सुरक्षा विषयी विद्यार्थ्यांना ज्ञान मिळणे गरजेचे : आयुष जोशी

लातूर : सायबर सुरक्षा विषयी विद्यार्थ्यांना विशेष ज्ञान मिळणे गरजेचे आहे. असे मत सायबर वॉरिअर आयुष जोशी यांनी व्यक्त केले.

लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालय व क्लिक हिल फाऊंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्ह्यात सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या विषयावर जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत पोद्दार इंटरनॅशनल स्कूल लातूर येथे विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम नुकताच घेण्यात आला. या विद्यालयातील ८ ते १० वीच्या विद्यार्थ्यांना सायबर वॉरिअर आयुष जोशी व श्रेयस माकणे यांनी विद्यार्थ्यांना फोटो मॅपिंग म्हणजे काय ? कृत्रिम बुद्धिमत्ताच्या माध्यमातून फोटो कसे तयार केले जातात. ऑनलाईन फसवणूक, बनावट लिंक, ओटीपी फसवणूक व सोशल मीडियाचा सुरक्षित वापर या संदर्भात माहिती दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारले.